**रे.के. नं. ६७ /२०२०**

**नि. क्र. ४५**

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०६ यांचा जबाब शथपेवर सुरु.**

**नाव** – प्रशांत सदानंद नागवेकर, पो.कॉ. १४२३

**वय**– २९ वर्षे, **नेमणुक** – देवरुख पोलीस ठाणे.

**सध्या राहणार** – मोर्डे, गवळीवाडी, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी.

**सरतपास – अभियोगपक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्रीम. ए. व्ही. गुरुपातगोळ यांच्याकडून –**

०१. दि. २०/०८/२०२० रोजी मी देवरुख पोलीस ठाणे अंतर्गत साखरपा दुरक्षेत्रात नेमणुकीस होतो. त्या दिवशी म.पो.ना. ए. पी. दुधाणे यांच्याकडे गु.र.नंबर ७५/२०२० चे तपासकाम सुपुर्त झाले होते. त्याचा घटनास्थळ पंचनामा करायचा असल्याने मी त्यांच्या सोबत मोर्डे गवळीवाडी येथे गेलो.

०२. पंचनामा सुरु असताना म.पो.ना. दुधाणे यांच्या तोंडी आदेशाने मी माझ्या मोबाईलवरुन घटनास्थळाचे फोटो काढलेले आहेत. त्याची प्रिंट पोलीस ठाण्यामध्ये काढण्यात आलेली आहे. मला आता दाखवण्यात आलेले एकुण चार फोटो तेच आहेत. सदरच्या फोटोंबाबत मी माझ्या सहीचे भा.पु.का.कलम ६५ ब चे प्रमाणपत्र तपास कामात दाखल केलेले आहे. मला दाखवलेले प्रमाणपत्र तेच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्याला **नि.४६** देण्यात येते.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास – आरोपीतर्फे वकील श्री. आर. के. शिंदे यांचेकडुन –**

०३. हे म्हणणे खरे आहे की, दुरक्षेत्रात कार्यरत असताना एखाद्या ठिकाणी

छाप्याकामी किंवा पंचनाम्यासाठी जायचे असल्यास हालचाल नोंदवहीला नोंद करावी लागते. हे म्हणणे खरे आहे की, एखाद्या ठिकाणी पंचनाम्यावेळी फोटोग्राफ्स काढले असता पंचनाम्यावर फोटोग्राफर म्हणून सही करावी लागते.

०४. हे म्हणणे खरे नाही की, मी दाखल केलेले भा.पु.का.कलम ६५ ब चे प्रमाणपत्र खोटे आणि खोडसाळ आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी तपासिक अधिका–यांकडे सदरचा मोबाईल माझ्याच मालकीचा होता हे दर्शवणारे कोणताही कागदोपत्री पुरावा दिला नाही. हे म्हणणे खरे नाही की, एखाद्या फोटोग्राफ मध्ये बदल करता येऊ शकतो. हे म्हणणे खरे नाही की, नि.४६ चे प्रमाणपत्र विहीत नमुन्यात नाही.

०५. हे म्हणणे खरे नाही की, दि. २०/०८/२०२० रोजी मी तपासिक अधिका–यांच्या तोंडी आदेशाअन्वये घटनास्थळाचे फोटो काढले आणि त्या बाबत नि.४६ चे प्रमाणपत्र दाखल केले हे मी खोटे नमुद करत आहे. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासातील मजकुर मी खोटा सांगितला आहे व आजरोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,**

SHRUTI HANUMANTRAO PATIL

Digitally signed by SHRUTI HANUMANTRAO PATIL
Date: 2024.12.23 17:12:36 +0530

**(श्रीमती श्रुती ह. पाटील)**

**दिनांक २३/१२/२०२४** **न्यायदंडाधिकारी वर्ग–१ देवरुख.**